# संचालनालय, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन, मुंबई

शासकीय दंत महाविद्यालय व रुग्णालय इमारत चौथा मजला,
सेंट जॉर्जेस् रुग्णालय आवार, पी. डीमेलो रोड, फोर्ट, मुंबई – ४०० ००१
दूरध्वनी: +९१–२२–२२६२०३६१–६५/२२६५२२५१/५७/५९ फॅक्स: +९१–२२–२२६२०५६२/२२६५२१६८
संकेतस्थळ: http:/www.dmer.org


क्र.संवैशिवसं/जाहि./विविका/बवक/प्राध्या/कत/२०१७ दिनांक: १६.०८.२०१७

## विविक्षीत कामासाठी अर्जाची जाहिरात

ग्रँट शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई या संस्थेतील विविक्षीत कामासाठी सेवा करार पद्धतीने पात्र सेवानिवृत्त शासकीय/निमशासकीय प्राध्यापकांची नामिकासूची तयार करण्यासाठी खालील विषयातील अर्ज मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | विविक्षीत कामाचे स्वरुप | पदांची संख्या | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक, बालरोग शल्यचिकित्साशास्त्र | बालरोग शल्यचिकित्सा विषयातील प्राध्यापक पदाची विविक्षीत कामे | १ पद | १ वर्षांसाठी |
| २ | प्राध्यापक, मूत्र शल्यचिकित्साशास्त्र | मूत्र शल्यचिकित्साशास्त्र विषयातील प्राध्यापक पदाची विविक्षीत कामे | १ पद | १ वर्षांसाठी |
| ३ | प्राध्यापक, औषध वैद्यक शास्त्र | औषध वैद्यक शास्त्र विषयातील प्राध्यापक पदाची विविक्षीत कामे | १ पद | १ वर्षांसाठी |
| ४ | प्राध्यापक, नेफ्रॉलाजी | नेफ्रॉलाजी विषयातील प्राध्यापक पदाची विविक्षीत कामे | १ पद | १ वर्षांसाठी |

वरील विषयातील प्राध्यापकांच्या विविक्षीत कामाचे स्वरुप या संचालनालयाच्या संकेतस्थळावर दिलेले आहे.

२. सदरहू करार तत्वावरील प्राध्यापकांना विविक्षीत कामासाठी शासन निर्णय क्र. संकिर्ण २७१५/प्रक्र१००/१३ दिनांक १७/१२/२०१६ नुसार निश्चित करण्यात आलेले परिश्रमिक त्यांच्या करार पद्धतीने नियुक्तीच्या कालावधीसाठी देय राहील. सदरहू शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक **201612171718241307** असा आहे.

३. पात्रता – उमेदवार प्राध्यापक या पदावरुन संबंधित विषयातील अर्हतेनुसार शासकीय/निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त झालेला असावा. उमेदवार सेवानिवृत्तीच्यावेळी संबंधीत पदाच्या पात्रतेचे भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या मानकांप्रमाणे इतर निकष पूर्ण केलेला असावा. उमेदवाराचे वय ७० वर्षांपेक्षा अधिक असू नये. सदर पदावर किमान तीन वर्षांचा अनुभव असावा.

४. अटी शर्ती – शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा करार पद्धतीने विविक्षीत कामासाठी घेताना शासन निर्णय क्र. संकिर्ण २७१५/ प्रक्र१००/१३, दिनांक १७ डिसेंबर, २०१६ मधील सर्व अटी व शर्ती लागू राहतील. सदरची जाहिरात विषयनिहाय नामिकासूची (Empanelment) करण्यासाठी देण्यात आली असून अर्ज केलेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईलच असे नाही. नामिका सुचीची वैधता ३ वर्षे राहील.

५. अर्जाचा कालावधी – सदर विविक्षित कामासाठी इच्छुक असणाऱ्या सेवानिवृत्त प्राध्यापकांनी दिनांक २८.०८.२०१७ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आपले अर्ज टपालाद्वारे अथवा हस्त बटवड्यांने पोहचतील अशाप्रकारे संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, ४था मजला, शासकीय दंत महाविद्यालय, सेंट जॉर्जेस रुग्णालय आवार, सीएसटी स्टेशनजवळ, मुंबई ४०० ००१ या पत्त्यावर पाठवावेत. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

अर्जाचा नमुना संचालनालयाच्या **www.dmer.org** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. सदरचा नमुना डाऊनलोड करून तो पूर्ण भरुन आवश्यक प्रमाणपत्रांसह वरील पत्त्यावर विहित मुदतीत सादर करावा.

सही/–
संचालक
वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई

ठिकाण – मुंबई
दिनांक – १६/०८/२०१७


महाNMK.कॉम
A non governmental employment new portal